नि.फौ.प्र.क्र.११०/२०१९
सरकार/विकास
निशाणी – १६

**अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्रमांक ०२ यांची जबानी**

मी याद्वारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की –
माझे नाव: राहुल नथ्थुजी चौधरी,
वयः ३५ वर्षे, व्यवसायः कृषी केंद्र,
निवासस्थान: खडसंगी, ता.चिमूर, जि. चंद्रपुर.

**शपथेवर सरतपासणी सहा. सरकारी अभियोक्ता श्रीमती पी. व्ही. गंधारे यांच्यामार्फत**

मी आरोपीला ओळखत नाही. घटना दिनांक ३०.०६.२०१९ रोजी खडसंगी येथे माझ्या कृषी केंद्रामध्ये घडली होती. त्या दिवशी माझ्या दुकानातील काउंटरचे लॉकर फोडण्यात आले होते. माझ्या दुकानातुन एकुण रु.३४,०००/– ची चोरी झाली होती. त्याबाबत मी पोलीस स्टेशन, चिमूर येथे जावुन तक्रार केली होती. आता मला अभिलेखावरील तोंडी तक्रार व छापील प्रथम खबरी अहवाल दाखविण्यात आला. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर बरोबर आहे. म्हणुन त्यांना अनुक्रमे **नि.क्र.१७** व **नि.क्र.१८** देण्यात आले. मला प्रस्तुतचे प्रकरण चालवायचे नाही. मला लेखी अथवा तोंडी पुरावा सुध्दा द्यायचा नाही. मला प्रस्तुतचे प्रकरण चालवायचे नाही म्हणून मी त्याबाबत कागदपत्र आज न्यायालयात दाखल केलेले आहे. मला माझे चोरी गेलेले पैसे अद्याप मिळालेले नाही.

**उलटतपास आरोपीतर्फे श्री. एस. टी. नन्नावरे वकील यांच्यामार्फत**

२. नाकारला.

श्रवणोत्तर स्विकृत
माझ्या समक्ष

ठिकाण – चिमूर
दिनांक – १३/०४/२०२६

(आर.डी. भुयारकर)
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, चिमूर